राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना अन्नधान्य,
कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पिकस्पर्धा

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक-पिकस्पर्धा-२०२०/प्र.क्र /४८/४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
दिनांक- ०५ आक्टोबर, २०२०

वाचा:-

१. पीकस्पर्धा नियमावली पुस्तिका जानेवारी २००२
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./कृमावि/वि.प्र.४/पीकस्पर्धा/१२०८९/२०२०, दि.१६/०४/२०२०

प्रस्तावना:

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती,मनोबल यांमध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सद्यस्थितीत सदरच्या योजनेमध्ये शेतक-याला राज्यस्तरावरील सर्वोच्च पारितोषिक मिळविण्यासाठी स्वतःचे शेतात तीन वर्ष सातत्याने तेच पिक घ्यावे लागते, उत्पादकतेत सातत्य राखावे लागते, दुर्देवाने अवकाळी आपत्कालीन/ नैसर्गिक आपत्तीसारखी परिस्थिती उद्भवल्यास उत्पादकतेतील घट शेतक-यांना नाउमेद करते. एकुणतः या बाबी टाळण्यासाठी शेतक-यांना सहभागी होता यावे व एकाच वर्षात त्या पिकाच्या येणा-या उत्पादकतेवर स्पर्धेमध्ये सहभागी होता यावे, या उद्देशाने यापुर्वीच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात येत आहे. यापुढे सदरची स्पर्धा तीन टप्प्यामध्ये आयोजित न करता एकाच वर्षात आयोजित करावयाची आहे. यामध्ये शेतक-यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीसे देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

कृषि आयुक्तालयाने या संदर्भामध्ये सादर केलेल्या प्रस्तावावर साकल्याने विचार करून समित्यांचे पुनर्गठन, पात्रतेचे निकष, विविध प्रपत्रे, पिकस्पर्धा विजेते संख्या, स्वरुप, बक्षिस रक्कमेमध्ये वाढ करणे, पिकस्पर्धाकरीता वेळापत्रक विहित करणे तसेच विविध स्तरावरील पिकस्पर्धेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषामध्ये कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता लक्षात घेवून पिकस्पर्धेबाबत यापुर्वीचे सर्व शासन निर्णय या निर्णयाद्वारे अधिक्रमीत करून सन २०२०-२१ च्या रब्बी हंगामापासून पिकस्पर्धेच्या निकषामध्ये बदल करणे संबधीची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:</u>**

वंचित/दुर्लक्षित तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन तंत्रज्ञानात वाढ होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेऊन जास्तीत जास्त पिके स्पर्धेत सहभागी होईल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

१. **पीकस्पर्धेतील पिके** : या स्पर्धेमध्ये खालील पिकांचा समावेश होतो.

- **खरीप पिके -भात,ज्वारी,बाजरी,मका,नाचणी(रागी),तूर,** मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल
- **रब्बी पिके -** ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ
- पिकस्पर्धेतील पिकाची निवड करताना पिकनिहाय तालुक्यातील क्षेत्र किमान <u>१०००</u> हेक्टर असावे.

**२. स्पर्धक संख्या, पीकस्पर्धा क्षेत्र, कापणी प्रयोग घ्यावयाची संख्या, -**

- पिकस्पर्धेसाठी पुर्ण तालुका हा एक घटक आधारभुत धरण्यात येईल.
- किमान स्पर्धक संख्या- सर्वसाधारण गटासाठी १० व आदिवासी गटासाठी ५
- पीकस्पर्धा मध्ये सहभागी लाभार्थीचे शेतावर त्यापिकाखाली किमान १० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.
- पीक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या - सर्वसाधारण गटासाठी ०५ व आदिवासी गटासाठी ०४
- पिक कापणी प्रयोगासाठी प्लॉटची मोजमापे:

| अ.क्र. | पिकाचे नाव | प्लॉटचे मोजमाप |
|---|---|---|
| १ | भात, खरीप/रब्बी ज्वारी, बाजरी, मका, भुईमुग, सूर्यफूल, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ | १० X १० मी. |
| २ | तूर | २० X १० मी. |
| ३ | मूग, उडीद, सोयाबीन, नाचणी (रागी) | १० X ५ मी. |

- पिकस्पर्धेतील पिकाच्या कापणीसाठी प्लॉटची निवड ही सांख्यिकी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी.
- पीककापणी प्रयोगाचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी **<u>यांचे स्तरावरुन</u>** तालुका कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व कृषि अधिकारी यांचेकडे द्यावी व तसे लेखी आदेश निर्गमित करावे.
- पीक कापणी करताना **<u>असंबंधीत मंडळातील अधिकारी</u>** यांना पर्यवेक्षण दयावे.

**३. स्पर्धेमध्ये भाग घेणारे शेतकरी:**

- पिकस्पर्धेसाठी सर्व शेतकऱ्यांना भाग घेता येईल.
- स्पर्धेत भाग घेताना शेतकऱ्याकडे त्याच्या नांवावर जमीन असली पाहिजे व जमीन तो स्वत: कसत असला पाहिजे.
- स्पर्धेत भाग घेणा-या शेतक-याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

**४. स्पधेसाठी प्रवेश शुल्क:**

- सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु.३०० राहील.
- प्रवेश शुल्क खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात मुदतीत जमा करावे.

२४०१ पीक संवर्धन
८०० इतर जमा रकमा
(०३) इतर संकीर्ण जमा रकमा

- तालुकास्तरावर स्पर्धा आयोजनासाठी सर्वसाधारण गटासाठी किमान १० व आदिवासी गटासाठी किमान ०५ यापेक्षा प्रवेश अर्ज कमी असल्यास, पिकस्पर्धा रद्द करण्यात येऊन प्रवेश शुल्क परत देण्यात येईल.
- तालुका कृषि अधिकारी यांनी पुरेशे पात्र अर्ज प्राप्त झाल्यानंतर स्पर्धा जाहीर करावी.
- स्पर्धा जाहीर झाल्यानंतर सहभागी शेतक-यास प्रवेश शुल्क परत दिले जाणार नाही.
- पीक स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकाने स्पर्धेतून माघार घ्यावयाची झाल्यास, कापणीपूर्वी १५ दिवस अगोदर माघार घेतल्याचे सर्व संबंधित अधिकाऱ्यास लेखी कळवावे. तसेच माघार कोणत्या कारणासाठी घेतली हे अर्जात सुस्पष्ट नमुद करावे.
- पीक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या सर्वसाधारण गटासाठी- ०५ व आदिवासी गटासाठी- ०४

**५. अर्ज दाखल करण्याची तारीख:-**

निरनिराळया हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख खालील प्रमाणे राहिल.

- खरीप हंगाम-
  - मूग व उडीद पिक:- ३१ जुलै
  - भात,ज्वारी,बाजरी,मका,नाचणी(रागी),तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल:- ३१ ऑगस्ट
- रब्बी हंगाम-

  ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ:- ३१ डिसेंबर

**६. पीक कापणी -**

**अ) ग्राम पातळीवरील समिती**:- पीक कापणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आली आहे.

१. पर्यवेक्षण अधिकारी - अध्यक्ष
२. सहभागी लाभार्थी (शेतकरी) - सदस्य
३. सरपंच - सदस्य
४. उपसरपंच - सदस्य
५. ग्रामपंचायत सदस्य - सदस्य
६. प्रगतशील शेतकरी - सदस्य
७. पोलीस पाटील - सदस्य
८. तलाठी - सदस्य
९. ग्रामसेवक - सदस्य

१०.कृषि पर्यवेक्षक - सदस्य
११.कृषि सहाय्यक / सेवक - सदस्य

**टिप**:- **अ)** सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यापैकी एक व प्रगतशील शेतकरी एक उपस्थित असणे आवश्यक आहे.

**ब)** पीकस्पर्धेतील सहभागी शेतक-यांच्या पीकाची उत्पादकता ही सांख्यिकी विभागाच्या पीककापणी प्रयोगाच्या मार्गदर्शक सूचना आधारभूत धरुन त्या कार्यपध्दतीने पिक कापणी प्लॉटची निवड करुन त्या प्लॉटचे येणारे उत्पादन आधारभूत घेवून उत्पादकता आकडेवारी किलो/हेक्टर मधे अंतिम करणेत येवून **कृषि** उपसंचालक माहिती, कृषि आयुक्तालय, पुणे यांना सादर करणेत यावी.

**७. पीकस्पर्धेचा निकाल -**

- ज्या शेतक-यांची पिकनिहाय उत्पादकता तालुक्याच्या सर्वसाधारण उत्पादकतेपेक्षा १.५ पट किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतक-यांना पीकस्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येऊन त्यांच्यामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात येतील. त्यापेक्षा कमी उत्पादन असणारे शेतकरी सर्व पातळीवरील पीकस्पर्धा पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.
- ज्या पीकाच्या उत्पादकतेची तालुकास्तरावर अधिकृत माहिती उपलब्ध नसेल अशा ठिकाणी राज्याच्या उत्पादकतेपेक्षा १.५ पट किवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतक-यांना पिकस्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येऊन त्यांच्यामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात येतील. त्यापेक्षा कमी उत्पादन असणारे शेतकरी सर्व पातळीवरील पिकस्पर्धा पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.
- पीकस्पर्धेत तालुक्यातून सहभागी झालेल्या स्पर्धकांची पीक कापणी झाल्यानंतर, पिकनिहाय उत्पादकतेच्या गुणानुक्रमे पहिल्या बारा शेतक-यांची माहिती कृषि उपसंचालक माहिती (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय पुणे यांचेकडे सादर करण्यात यावी.

➢ राज्यस्तर पिकस्पर्धा निकाल - राज्यातील सर्व स्पर्धकांतून पीक कापणीनंतर आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन त्यातून राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

➢ विभागस्तर पिकस्पर्धा निकाल - राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित विभागाच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून विभागस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

- जिल्हास्तर पिकस्पर्धा निकाल- राज्य आणि विभागस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.
- तालुकास्तर पिकस्पर्धा निकाल - राज्य, विभाग आणि जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून तालुकास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

**८. पीकस्पर्धा विजेते - बक्षिस स्वरुप**

- राज्यपातळीवरील विजेता बक्षिसे कृषि पुरस्कार सत्कार समारंभात देण्यात येतील.
- बक्षिस स्वरुप

| अ.क्र | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| २ | जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| ३ | विभाग पातळी | २५,००० | २०,००० | १५,००० |
| ४ | राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

**९. पीकस्पर्धा समिती -**

- पिकस्पर्धा निकाल घोषित करणेसाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

| | |
|---|---|
| १) आयुक्त, (कृषि) | अध्यक्ष |
| २) कृषि संचालक (प्रक्रिया व नियोजन ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| २) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ३) कृषि सहसंचालक (वि.प्र.-१ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ४) कृषि सहसंचालक (वि.प्र. २ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ५) कृषि सहसंचालक (वि.प्र. ३ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ६) मुख्य सांख्यिकी, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ७) कृषि उपसंचालक (माहिती ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य सचिव |

- पीकस्पर्धेबद्दल अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला आहे व हा निर्णय राज्य पातळीवरील सर्व सहभागी स्पर्धकांना बंधनकारक राहील.

**१०.** पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी सहभागी होतील याबाबत आयुक्तालय आणि क्षेत्रिय स्तरावरुन प्रयत्न करण्यात यावेत. तसेच स्पर्धा राबविणेबाबतची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेवर व संनियंत्रणाची जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.

**११.** पीक स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांचे अर्ज विहित नमुन्यात(प्रपत्र-अ) भरुन, ठरवून दिलेले प्रवेश शुल्क चलन व ७/१२ च्या उताऱ्यासह कागद पत्रांची पूर्तता संबंधीत अधिकाऱ्याकडे पाठवावेत.

**१२.** पिक स्पर्धेच्या अंमलबजावणीकरीता आयुक्त (कृषि) यांच्या स्तरावरून मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात याव्यात.

**१३.** हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र.१६७/२०२०/व्यय-०१, दिनांक-०८.०९.२०२० अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**१४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२०१००५१७१५४४५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(सुग्रिव धपाटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य.
२. मा. मंत्री, (कृषि), महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यमंत्री, (कृषि), महाराष्ट्र राज्य.
४. मा. सचिव,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र ह (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर
८. वित्त विभाग (व्यय-१, अर्थसंकल्प-१३, विनियम) मंत्रालय, मुंबई-३२
९. उप सचिव (४-अे/) यांचे स्विय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व
११. कृषि संचालक, (सर्व) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
१३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सर्व
१४. तालुका कृषि अधिकारी, सर्व
१५. निवड नस्ती.

**<u>प्रपत्र-अ</u>**

**पीकस्पर्धेचा अर्जाचा नमुना**

**(तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य)**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी, . जिल्हा-**

मी श्री. ------------------------------------------मोबाईल नंबर----------------------

राहणार---------------------- पोस्ट------------------- तालुका-------------- जिल्हा----

१) पिकाचे नाव:-

२) पिकाचा वाण:-

३) हंगाम:-

४) पेरणी/लागवड दिनांक:-

५) धारण केलेले ८-अ नुसार एकूण क्षेत्र -

६) ७/१२ नुसार, गटनिहाय क्षेत्र -

७) सर्वे नंबर------------------ गट नंबर--------------- पोट हिस्सा नंबर---------- मध्ये पीकाची हेक्टर क्षेत्रावर सलग केली आहे.

८) बागायत आहे किंवा जिरायत:

९) जमिनीचा प्रकार:-

१०) प्रवेश फी भरलेली रक्कम:-

११) चलन पावती क्रमांक व दिनांक:-

पीकस्पर्धेतील जे नियम व अटी आहेत ते मला बंधनकारक आहेत व ते मला मान्य आहेत. मी पीक कापणीच्या वेळी आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यास तयार आहे.

**स्पर्धकाची सही**

**तक्ता क्रमांक.१**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य)**

स्पर्धेतील प्लॉटमधील पिकाच्या लागवडीचे क्षेत्र व लागवडीच्या खर्चाच्या माहितीचा तक्ता.

पिकांचे नांव-------------------

१) स्पर्धेकाचे नांव (संपूर्ण) -------------------------------------------------------

२) स्पर्धकाच्या वडिलांचे / पतीचे नाव (संपूर्ण) ------------------------------------------

३) पूर्ण पत्ता: गाव---------------------------- पोस्ट-------------- तालुका------------
जिल्हा-------------------------------

| | | |
|---|---|---|
| ४) **स्पर्धेतील प्लॉटचे क्षेत्र (हेक्टर)** | | |
| ५) **जमिनीचा प्रकार(समपातळीतील आहे किंवा नाही तसेच निचरा होणारी आहे किंवा नाही याचा तपशील)** | | |
| ६) **पूर्व मशागत**<br>**अ) नांगरटीच्या पाळयांची संख्या.**<br>**ब) कुळवणीच्या पाळयांची संख्या.** | | |
| ७) **प्लॉटमध्ये घेतलेले पूर्वीचे पीक** | | |
| ८) **गादी वाफ्यावर रोपे केली असतील तर त्याचा दिनांक** | | |
| ९) **बियाण्याची जात** | | |
| १०) **बियाणे कोठून मिळविले?** | | |
| ११) **पेरणीची अथवा रोपे लावणीची तारीख**<br>**अ) पेरणीस किती बियाणे वापरल (दर हेक्टरी )?** | | |
| १२) **पेरणीचा प्रकार** | | |
| १३) **दोन ओळीतील व दोन रोपातील अंतर (सें.मी.)**<br>**अ) दर चौरस मी. मधील रोपांची संख्या व फुटवे.**<br>**ब) हेक्टरमधील अंदाजे रोपांची संख्या.** | | |
| १४) **जमिनीतील कृमी कीटकांचा नाश करण्यासाठी वापरलेली औषधे**<br>**अ) औषधाचे नांव :-**<br>**ब) हेक्टरी किती वापरले ?** | | |
| १५) **दिलेले खत**<br>**अ) शेण खत, कंपोस्ट खत (हेक्टरी) दिलेल्या गाडयांची संख्या व किती दिले?**<br>**ब) हिरवळीचे खताचा प्रकार व वापरलेले बी व केव्हा गाडले?** | | |

| | | |
|---|---|---|
| क) पेंडीचे खत दिले असल्यास त्याचा प्रकार, हेक्टरी किती व केंव्हा दिले?<br>ड) रासायनिक खताचा प्रकार, हेक्टरी किती व केंव्हा दिले? | | |
| १६) दिलेल्या पाणी पाळी संख्या व किती अंतराने दिले? | | |
| १७) खुरपणी व कोळपणी केल्याची संख्या | | |
| १८) पिकाची परिस्थिती | | |
| १९) पिकावर पडलेली कीड व रोग<br>अ) कीड व रोगाचे नाव<br>ब) कीटकनाशक व रोगनाशक वापरलेल्या औषधांची नांवे<br>क) औषध किती वापरले केंव्हा व किती वेळा वापरले? हेक्टरी प्रमाण | | |
| २०) अ) प्लॉटमधील एकूण उत्पादन<br>--------------क्विंटल---------------------किलो<br>ब) एका हेक्टरमधील एकूण उत्पादन --------------क्विंटल---------------------किलो | | |
| २१) कापणीची तारीख व कापणीची पध्दत | | |
| २२) लागवडीचा दर हेक्टरी खर्च | | |
| २३) उत्पादनाची एकूण किंमत | | |
| २४) पिकाच्या उत्पादनाची एकूण किंमत (दर हेक्टरमधील) | | |
| २५) इतर काही वैशिष्टपूर्ण माहिती<br>१) लोंबी / कणसांची सरासरी लांबी<br>२) एका लोंबी / कणसातील दाण्याची संख्या व वजन<br>३) एक ग्रॅममधील दाण्यांची संख्या | | |

दाखला देण्यात येतो की, वरील लागवडीची पध्दत शेतकऱ्यांने अमलात आणली असून, वर दिलेली माहिती बरोबर आहे.

सही
नाव - लाभार्थी शेतकरी

सही
पर्यवेक्षण अधिकारी,--------

टीप : नंबर २० मधील माहिती ही मळणीनंतर दाणे बनविल्यानंतर त्याचे जे वजन येईल त्याची माहिती द्यावी.

**तक्ता क्रमांक.२**

**(अन्नधान्य, गळीतधान्य पीके) पीकस्पर्धेतील प्लॉटमधील उत्पादनाची माहिती**

| अ.क्र | विवरण | |
|---|---|---|
| १ | **स्पर्धकाचे नांव,संपुर्ण पत्ता-** | |
| २ | **पिकाची वाण :-** | |
| ३ | **कापणीची तारीख :-** | |
| ४ | **बाबनिहाय विवरण** | **ग्रॅम** |
| ५ | १० आर मधील पिकाचे प्रत्यक्ष उत्पन्न. | |
| ६ | १/१० भागातील वजन | |
| | अ) १/१० भागातील पेंडीसह/कणसासह दाण्याचे वजन | |
| | ब) १/१० भागातील निव्वळ दाण्याचे वजन | |
| | क) १/१० भागातील निव्वळ भुशाचे वजन. | |
| ७ | ९/१० भागातील पेंडीसह / कणसासह दाण्याचे वजन | |
| | अ) ९/१० भागातील निव्वळ दाण्याचे/कणसाचे वजन. | |
| | ब) ९/१० भागातील निव्वळ भुशाचे वजन | |
| | क) सर्व भागातील पेडयासह/ कणसासह वजन | |
| ८ | सर्व भागातील वजन | |
| | अ) सर्व भागातील पेंडीसह दाण्याचे वजन | |
| | ब) सर्व भागातील निव्वळ दाण्याचे वजन | |
| | क) सर्व भागातील निव्वळ भुशाचे वजन. | |
| ९ | दाणे व भुसा यांचे प्रमाण | |
| | अ) १/१० भागातील दाणे व भुसा यांचे प्रमाण | |
| | ब) ९/१० भागातील दाणे व भुसा यांचे प्रमाण | |
| | क) सर्व भागातील दाणे व भुसा यांचे प्रमाण | |
| १० | **एका हेक्टरमधील दाण्यांचे वजन-------क्विंटल------ किलो------ग्रॅम** | |

**दाखला देण्यात येतो की, पीकाची कापणी पीकस्पर्धेच्या नियमानुसार आम्हा सर्वासमक्ष केली असून वरील उत्पादन बरोबर आहे.**

**समितीतील सर्व सदस्यांची स्वाक्षरी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सही - | सही - | सही - | सही - | सही - |
| नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- |

**पर्यवेक्षण अधिकारी सहभागी लाभार्थी (शेतकरी) सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सही - | सही - | सही - | सही - | सही - |
| नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- | नाव:- |

**प्रगतशील शेतकरी (२) पोलीस पाटील तलाठी ग्रामसेवक कृषि पर्यवेक्षक**

सही -

नाव :-

**कृषि सहाय्यक / सेवक**

**टीप:-** १. क्रमांक ६ मधील कणसांचे वजन घ्यावे, पोती अधिक कणसांचे वजन घेऊ नये.

२. सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यापैकी एक व प्रगतशील शेतकरी किमान एक उपस्थित असणे आवश्यक आहे.

**<u>तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य</u>**
**<u>पीकस्पर्धा मार्गदर्शक सूचना</u>**

जा.क्र./वि.प्र.४/पीकस्पर्धा/मा.सू./२८१७० /२०२०
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक ०५/११ /२०२०

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक, (सर्व)**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी, (सर्व)**
**३. तालुका कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषय :- तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या राज्यांतर्गत पीकस्पर्धेच्यासुधारित मार्गदर्शक सूचना**
**संदर्भ** - १. पीकस्पर्धा नियमावली पुस्तिका जानेवारी २००२
२.शासन निर्णय क्रमांक-पिकस्पर्धा-२०२०/प्र.क्र./४८/४-ए कृषि व पदुम विभाग मंत्रालय,मुंबई दि.०५/१०/२०२०

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतक-यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतक-यांना, मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती , मनोबल यांमध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतक-यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतक-यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सद्यस्थितीत सदरच्या योजनेमध्ये शेतक-याला राज्यस्तरावरील सर्वोच्च पारितोषिक मिळविण्यासाठी स्वतःचे शेतात तीन वर्ष सातत्याने तेच पिक घ्यावे लागते, उत्पादकतेत सातत्य राखावे लागते, दुर्देवाने अवकाळी आपत्कालीन/ नैसर्गिक आपत्तीसारखी परिस्थिती उद्भवल्यास उत्पादकतेतील घट शेतक-यांना नाउमेद करते. एकुणतः या बाबी टाळण्यासाठी शेतक-यांना सहभागी होता यावे व एकाच वर्षात त्या पिकाच्या येणा-या उत्पादकतेवर स्पर्धेमध्ये सहभागी होता यावे, या उद्देशाने यापुर्वीच्या पदधतीमध्ये बदल करण्यात येत आहे. यापुढे सदरची स्पर्धा तीन टप्प्यामध्ये आयोजित न करता एकाच वर्षात आयोजित करावयाची आहे. यामध्ये शेतक-यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीसे देण्यात येणार आहे.

विविध स्तरावरील पिकस्पर्धेसाठी विहीत करण्यात आलेल्या निकषामध्ये कालानुरूप बदल करण्याची आवश्यकता लक्षात घेवून उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये, पिकस्पर्धेच्या समित्या, पात्रतेचे निकष, विविध प्रपत्रे, पिकस्पर्धा विजेते संख्या, स्वरुप, बक्षिस रक्कम, वेळापत्रक इत्यादी बांबीमध्ये बदल करण्यात आला आहे. पिकस्पर्धेबाबत यापुर्वीचे सर्व शासन निर्णय या निर्णयाद्वारे अधिक्रमीत करण्यात आले आहे.

या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब **<u>रब्बी हंगाम २०२०-२१ पासून</u>** करण्यात यावा.

वंचित/दुर्लक्षित तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादनात, तंत्रज्ञानात वाढ होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेऊन जास्तीत जास्त शेतकरी पिकस्पर्धेत सहभागी होईल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

१. **पीकस्पर्धेतील समाविष्ट पिके** : या स्पर्धेमध्ये खालील पिकांचा समावेश होतो.

- **खरीप हंगाम –** भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी(रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल (११ पिके)
- **रब्बी हंगाम –** ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ ( ०६ पिके )
- पिकस्पर्धेतील पिकाची निवड करताना पिकनिहाय तालुक्यातील संबंधित पिकाखालील क्षेत्र किमान **१०००** हेक्टर असावे. संबंधित तालुका कृषि अधिकारी यांनी पिकाखालील क्षेत्र प्रमाणित करुन तालुक्यात पिकनिहाय कोणत्या पिकाकरीता स्पर्धा आयोजित करण्यात येतील, हे हंगामनिहाय जाहीर करावे. तालुका कृषि अधिकारी जाहीर करतील त्याच पिकांसाठी स्पर्धकांचे अर्ज स्विकारण्यात यावेत.

२. **स्पर्धक संख्या, पीकस्पर्धा क्षेत्र, पीक कापणी प्रयोग घ्यावयाची संख्या, -**

- पिकस्पर्धेसाठी पिकनिहाय तालुका हा एक घटक आधारभुत धरण्यात येईल.
- किमान स्पर्धक संख्या- सर्वसाधारण गटासाठी १० व आदिवासी गटासाठी ५
- पीकस्पर्धा मध्ये सहभागी लाभार्थीचे शेतावर त्यापिकाखाली किमान १० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे.
- तालुक्यात पीक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या - सर्वसाधारण गटासाठी ०५ व आदिवासी गटासाठी ०४
- पिक कापणी प्रयोगासाठी प्लॉटची मोजमापे:

| अ.क्र. | पिकाचे नाव | प्लॉटचे मोजमाप |
|---|---|---|
| १ | भात, खरीप/रब्बी ज्वारी, बाजरी, मका, भुईमुग, सूर्यफूल, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ | १० X १० मी. |
| २ | तूर | २० X १० मी. |
| ३ | मूग, उडीद, सोयाबीन, नाचणी (रागी) | १० X ५ मी. |

- पिकस्पर्धेतील पिकाच्या कापणीसाठी प्लॉटची निवड ही सांख्यिकी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात यावी.
- पीककापणी प्रयोगाचे पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांचे स्तरावरुन तालुका कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी व कृषि अधिकारी यांचेकडे द्यावी व तसे लेखी आदेश निर्गमित करावे.
- पीक कापणी करताना **असंबंधीत मंडळातील अधिकारी** यांना पर्यवेक्षण दयावे.

३. **स्पर्धेमध्ये भाग घेणारे शेतकरी:**

- पिकस्पर्धेसाठी सर्व शेतकऱ्यांना भाग घेता येईल.

- स्पर्धेत भाग घेताना शेतकऱ्याकडे त्याच्या नांवावर जमीन असली पाहिजे व जमीन तो स्वत: कसत असला पाहिजे.
- स्पर्धेत भाग घेणा-या शेतक-याला एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग घेता येईल.

**४. स्पधेसाठी प्रवेश शुल्क:**

- सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु.३०० राहील.
- प्रवेश शुल्क खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात मुदतीत जमा करावे.

२४०१ पीक संवर्धन

८०० इतर जमा रकमा

(०३) इतर संकीर्ण जमा रकमा

- तालुकास्तरावर स्पर्धा आयोजनासाठी सर्वसाधारण गटासाठी किमान १० व आदिवासी गटासाठी किमान ०५ यापेक्षा प्रवेश अर्ज कमी असल्यास, पिकस्पर्धा रद्द करण्यात येऊन प्रवेश शुल्क परत देण्यात येईल.
- तालुका कृषि अधिकारी यांनी पुरेशे पात्र अर्ज प्राप्त झाल्यानंतर स्पर्धा जाहीर करावी.
- स्पर्धा जाहीर झाल्यानंतर सहभागी शेतक-यास प्रवेश शुल्क परत दिले जाणार नाही.
- पीक स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकाने स्पर्धेतून माघार घ्यावयाची झाल्यास, कापणीपूर्वी १५ दिवस अगोदर माघार घेतल्याचे सर्व संबंधित अधिकाऱ्यास लेखी कळवावे. तसेच माघार कोणत्या कारणासाठी घेतली हे अर्जात सुस्पष्ट नमुद करावे. (माघार घ्यावयाचा अर्ज नमुना सोबत सहपत्रित)
- पीक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या सर्वसाधारण गटासाठी -०५ व आदिवासी गटासाठी -०४

**५. अर्ज दाखल करण्याची तारीख:-**

निरनिराळया हंगामामध्ये पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख खालील प्रमाणे राहिल.

- खरीप हंगाम
  - मूग व उडीद पिक- ३१ जुलै
  - भात,ज्वारी,बाजरी,मका,नाचणी(रागी), तूर, सोयाबीन, भुईमुग, सूर्यफूल - ३१ ऑगस्ट
- रब्बी हंगाम

  ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस, तीळ: ३१ डिसेंबर
- अर्ज दाखल करण्याच्या तारखेच्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास, त्यापुढिल शासकीय सुट्टी नसलेली तारिख गृहीत धरण्यात यावी.
- पीक स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांचे अर्ज विहित नमुन्यात (प्रपत्र-अ) भरुन, ठरवून दिलेले प्रवेश शुल्क चलन व ७/१२, ८-अ चा उतारा व जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास) या कागद पत्रांची पूर्तता करुन संबंधीत अधिकाऱ्याकडे पाठवावेत.

- अर्ज मागविण्याची मुदत संपल्यानंतर १५ दिवसाच्या आत तालुका कृषि अधिकारी यांनी पिकस्पर्धा जाहीर करावी.
- तालुका कृषि अधिकारी यांनी कापणीपुर्वी, पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतक-यांची पिकनिहाय व तालुकानिहाय माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाला **प्रपत्र क** मध्ये पाठवावी.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कापणीपुर्वी, पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतक-यांची पिकनिहाय व तालुकानिहाय माहिती विभाग़ीय कृषि सहसंचालक कार्यालयाला **प्रपत्र क** मध्ये पाठवावी.
- विभागीय कृषि सहसंचालक यांनी कापणीपुर्वी, पिकस्पर्धेकरीता सहभागी शेतक-यांची पिकनिहाय व तालुकानिहाय माहिती अधिनस्त कार्यालयांकडून प्राप्त करुन घेऊन एकत्रित **प्रपत्र क** मध्ये कृषि आयुक्तालयास सादर करावी.

**६. पीक कापणी –**

**अ) ग्राम पातळीवरील समिती**:- पीक कापणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात आली आहे.

१. पर्यवेक्षण अधिकारी - अध्यक्ष
२. सहभागी लाभार्थी (शेतकरी) - सदस्य
३. सरपंच - सदस्य
४. उपसरपंच - सदस्य
५. ग्रामपंचायत सदस्य - सदस्य
६. प्रगतशील शेतकरी - सदस्य
७. पोलीस पाटील - सदस्य
८. तलाठी - सदस्य
९. ग्रामसेवक - सदस्य
१०.कृषि पर्यवेक्षक - सदस्य
११.कृषि सहाय्यक / सेवक - सदस्य सचिव

**टिप**:- **अ)** सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्यापैकी एक व एक प्रगतशील शेतकरी किमान उपस्थित असणे आवश्यक आहे.

**ब)** परिक्षण समितीतील सदस्यांना पिकस्पर्धेत स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही.

**क)** पीकस्पर्धेतील सहभागी शेतक-यांच्या पीकाची उत्पादकता ही सांख्यिकी विभागाच्या पीककापणी प्रयोगाच्या मार्गदर्शक सूचना आधारभूत धरुन त्या कार्यपध्दतीने पिक कापणी प्लॉटची निवड करुन त्या प्लॉटचे येणारे उत्पादन आधारभूत घेवून उत्पादकता आकडेवारी किलो/हेक्टर मधे अंतिम करणेत यावी.

७. पीकस्पर्धेचा निकाल -

- ज्या शेतक-यांची पिकनिहाय उत्पादकता तालुक्याच्या सर्वसाधारण सरासरी उत्पादकतेपेक्षा १.५ पट किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतक-यांना पीकस्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येऊन त्यांच्यामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात येतील. त्यापेक्षा कमी उत्पादन असणारे शेतकरी सर्व पातळीवरील पीकस्पर्धा पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.
- ज्या पीकाच्या उत्पादकतेची तालुकास्तरावर अधिकृत माहिती उपलब्ध नसेल अशा ठिकाणी राज्याच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा १.५ पट किवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतक-यांना पिकस्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येऊन त्यांच्यामधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडण्यात येतील. त्यापेक्षा कमी उत्पादन असणारे शेतकरी सर्व पातळीवरील पिकस्पर्धा पुरस्कारासाठी अपात्र समजण्यात येतील.

➢ पीकस्पर्धेत तालुक्यातून सहभागी झालेल्या स्पर्धकांची पीक कापणी झाल्यानंतर, संबंधित कृषी सहाय्यक/सेवक यांनी **प्रपत्र ब** मध्ये तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावे. तद्‌नंतर तालुकास्तरावर पीक निहाय प्राप्त पीक कापणीच्या आकडेवारीनुसार **प्रपत्र ड** मध्ये तालुका कृषि अधिकारी यांचेस्तरावर संकलन करण्यात यावे. तालुका कृषि अधिकारी यांनी तालुकास्तरावर पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमांकान्वये **पहिल्या नऊ** (९) शेतकऱ्यांची आकडेवारी संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना खरीप पिक स्पर्धेच्या बाबतीत माहे १५ नोव्हेंबर व रब्बी पिकस्पर्धेच्या बाबतीत माहे ३० एप्रिल अखेर **प्रपत्र इ** मध्ये सादर करावी.

➢ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , यांनी जिल्हास्तरावर पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमांकान्वये **पहिल्या सहा** (६) शेतकऱ्यांची माहिती **प्रपत्र इ -१** मध्ये विभागीय कृषी सहसंचालक यांना खरीप पिक स्पर्धेच्या बाबतीत ३० नोव्हेंबर व रब्बी पिकस्पर्धेच्या बाबतीत माहे १५ मे पर्यंत सादर करावी.

➢ विभागीय कृषी सहसंचालक यांनी विभागस्तरावर पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार सर्वसाधारण व आदिवासी शेतकऱ्यांचे गुणानुक्रमांकान्वये **पहिल्या तीन** (३) शेतकऱ्यांची माहिती **प्रपत्र इ -२** मध्ये कृषी उपसंचालक (माहिती) कृषी आयुक्तालय , महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे खरीप पिकस्पर्धे च्या बाबतीत माहे १५ डिसेंबर आणि रब्बी पिकस्पर्धे च्या बाबतीत ३१ मे पर्यंत सादर करावी.

➢ राज्यस्तर पिकस्पर्धा निकाल - राज्यातील सर्व स्पर्धकांतून पीक कापणीनंतर आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन त्यातून राज्यस्तरावरील पिकनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते निवडण्यात येतील.

➢ विभागस्तर पिकस्पर्धा निकाल - राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित विभागाच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून विभागस्तरावरील पिकनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेत्यांची विभागीय कृषि सहसंचालक यांनी निवड करुन निकाल घोषित करावेत.

- जिल्हास्तर पिकस्पर्धा निकाल- राज्य आणि विभागस्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून जिल्हास्तरावरील पिकनिहाय प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेत्यांची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निवड करुन निकाल घोषित करावेत.
- तालुकास्तर पिकस्पर्धा निकाल - राज्य, विभाग आणि जिल्हास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेते वगळून, संबंधित तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील स्पर्धकांमधून तालुकास्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पिकस्पर्धा विजेत्यांची तालुका कृषि अधिकारी यांनी निवड करुन निकाल घोषित करावेत.
- राज्यस्तरीय पुरस्कार घोषित झालेनंतर, विभाग, जिल्हा व तालुका पातळीवरील निकाल घोषित करण्यात येतील.

## ८. राज्यस्तरीय पीकस्पर्धा निकाल समिती -

- पिकस्पर्धा निकाल घोषित करणेसाठी खालीलप्रमाणे समिती राहील.

| | |
|---|---|
| १) आयुक्त, (कृषि) | अध्यक्ष |
| २) कृषि संचालक (प्रक्रिया व नियोजन ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| २) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ३) कृषि सहसंचालक (वि.प्र.-१ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ४) कृषि सहसंचालक (वि.प्र. २ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ५) कृषि सहसंचालक (वि.प्र. ३ ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ६) मुख्य सांख्यिकी, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य |
| ७) कृषि उपसंचालक (माहिती ) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे | सदस्य सचिव |

- पिकस्पर्धेबद्दल अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला आहे व हा निर्णय राज्य पातळीवरील सर्व सहभागी स्पर्धकांना बंधनकारक राहील.

## ९. पीकस्पर्धा विजेते - बक्षिस स्वरुप

- विभाग, जिल्हा व तालुका पातळीवरील बक्षिसे संबंधित पातळीवरील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करुन सन्मानपूर्वक देणेत यावेत.
- राज्यपातळीवरील पिकनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे, कृषि पुरस्कार सत्कार समारंभात देण्यात येतील.
- **बक्षिस स्वरुप**

| अ.क्र | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| २ | जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| ३ | विभाग पातळी | २५,००० | २०,००० | १५,००० |
| ४ | राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

१०. पिकस्पर्धेसाठी जास्तीत जास्त शेतकरी सहभागी होतील, याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन प्रयत्न करण्यात यावेत. तसेच स्पर्धा राबविणेबाबतची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेवर व संनियंत्रणाची जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.

पिकस्पर्धा योजनेस आकाशवाणी, दुरदर्शन, स्थानिक वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्दी माध्यमाव्दारे मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देऊन विविध पिकस्पर्धामध्ये भाग घेण्यास शेतक-यांना प्रवृत्त करावे. व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पिकांचे उत्पादन वाढीची निकोप स्पर्धा या माध्यमातून राज्यभर मोठ्या प्रमाणात निर्माण होईल. आणि शेतक-यांचे उत्पन्न वाढीमध्ये मोठे योगदान राहील, अशी अपेक्षा आहे. हंगामनिहाय पिकस्पर्धा आयोजनाचा पिकनिहाय अहवाल स्पर्धेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक संपल्यानंतर १५ दिवसात कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**सोबत - सहपत्रे**

(नारायण शिसोदे)
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रत –** माहितीस्तव सविनय सादर.

१. मा.खाजगी सचिव, मा. मंत्री, (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. सचिव,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कक्ष अधिकारी (संबंधित) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**प्रपत्र-अ**

**<u>पीकस्पर्धेचा अर्जाचा नमुना</u>**

**(तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट**

**दिनांक -**

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी, ,जिल्हा-**

मी, श्री. ---------------------------------------------मोबाईल नंबर----------------------
राहणार---------------------- पोस्ट------------------- तालुका-------------- जिल्हा----
खाली नमुद तपशिलानुसार, पिकस्पर्धेत भाग घेऊ इच्छितो.

प्रवर्ग :- सर्वसाधारण गट ☐ आदिवासी गट ☐

१) पिकाचे नाव:-

२) पिकाचा वाण:-

३) हंगाम:-

४) पेरणी/लागवड दिनांक:-

५) धारण केलेले ८-अ नुसार एकूण क्षेत्र -

६) ७/१२ नुसार, गटनिहाय क्षेत्र -

७) सर्वे नंबर------------------- गट नंबर--------------- पोट हिस्सा नंबर---------- मध्ये पीकाची हेक्टर क्षेत्रावर सलग केली आहे.

८) बागायत आहे किंवा जिरायत:

९) जमिनीचा प्रकार:-

१०) प्रवेश फी भरलेली रक्कम:-

११) चलन पावती क्रमांक व दिनांक:-

१२) बँक खाते तपशिल :- बँकेचे नाव :- बँक शाखा :-
खाते क्रंमांक :- आय.एफ.सी.कोड:-

१३) आधार कार्ड क्रमांक :-

१४) जात प्रवर्ग (आदिवासी असल्यास):-

मी स्वतः शेती करत असून, शेती हे माझे मुख्य उत्पन्नाचे स्रोत आहे. पीकस्पर्धेतील सर्व नियम व अटी मला बंधनकारक आहेत व ते मला मान्य आहेत. मी पीक कापणीच्या वेळी आवश्यक ते सर्व सहकार्य देण्यास तयार आहे.

सोबत ७/१२, ८-अ उतारा व पिकस्पर्धा प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत आणि जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास) जोडले आहे.

**स्पर्धकाची सही**

नाव -

संपर्क क्र. -

**प्रपत्र-ब**

**(तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट**

स्पर्धेतील प्लॉटमधील पिकाच्या लागवडीचे क्षेत्र व लागवडीच्या खर्चाच्या माहितीचा तक्ता.

पिकांचे नांव-------------------

१) स्पर्धेकाचे नांव (संपूर्ण) ----------------------------------------------------------

२) स्पर्धकाच्या वडिलांचे / पतीचे नाव (संपूर्ण) ---------------------------------------------

३) पूर्ण पत्ता: गाव---------------------------- पोस्ट-------------- तालुका------------ जिल्हा-------------------------------

| | | |
|---|---|---|
| ४) स्पर्धेतील प्लॉटचे क्षेत्र (हेक्टर) | | |
| ५) जमिनीचा प्रकार(समपातळीतील आहे किंवा नाही<br>तसेच निचरा होणारी आहे किंवा नाही याचा तपशील) | | |
| ६) पूर्व मशागत<br>अ) नांगरटीच्या पाळयांची संख्या.<br>ब) कुळवणीच्या पाळयांची संख्या. | | |
| ७) प्लॉटमध्ये घेतलेले पूर्वीचे पीक | | |
| ८) गादी वाफ्यावर रोपे केली असतील तर त्याचा दिनांक | | |
| ९) बियाण्याची जात | | |
| १०) बियाणे कोठून मिळविले? | | |
| ११) पेरणीची अथवा रोपे लावणीची तारीख<br>अ) पेरणीस किती बियाणे वापरल (दर हेक्टरी )? | | |
| १२) पेरणीचा प्रकार | | |
| १३) दोन ओळीतील व दोन रोपातील अंतर (सें.मी.)<br>अ) दर चौरस मी. मधील रोपांची संख्या व फुटवे.<br>ब) हेक्टरमधील अंदाजे रोपांची संख्या. | | |
| १४) जमिनीतील कृमी कीटकांचा नाश करण्यासाठी वापरलेली औषधे<br>अ) औषधाचे नांव :-<br>ब) हेक्टरी किती वापरले ? | | |
| १५) दिलेले खत<br>अ) शेण खत, कंपोस्ट खत (हेक्टरी) दिलेल्या गाडयांची संख्या व किती दिले?<br>ब) हिरवळीचे खताचा प्रकार व वापरलेले बी व केव्हा गाडले?<br>क) पेंडीचे खत दिले असल्यास त्याचा प्रकार, हेक्टरी किती व केंव्हा दिले?<br>ड) रासायनिक खताचा प्रकार, हेक्टरी किती व केंव्हा दिले? | | |

| | | |
|---|---|---|
| १६) दिलेल्या पाणी पाळी संख्या व किती अंतराने दिले? | | |
| १७) खुरपणी व कोळपणी केल्याची संख्या | | |
| १८) पिकाची परिस्थिती | | |
| १९) पिकावर पडलेली कीड व रोग<br>अ) कीड व रोगाचे नाव<br>ब) कीटकनाशक व रोगनाशक वापरलेल्या औषधांची नांवे<br>क) औषध किती वापरले केंव्हा व किती वेळा वापरले? हेक्टरी प्रमाण | | |
| २०) अ) प्लॉटमधील एकूण उत्पादन ( पिक कापणी वेळी )<br>-------------- किलो -----------ग्रॅम<br>ब) एका हेक्टरमधील एकूण उत्पादन<br>-------------- किलो -----------ग्रॅम | | |
| २१) कापणीची तारीख व कापणीची पध्दत | | |
| २२) लागवडीचा दर हेक्टरी खर्च | | |
| २३) उत्पादनाची एकूण किंमत | | |
| २४) पिकाच्या उत्पादनाची एकूण किंमत (दर हेक्टरमधील) | | |
| २५) इतर काही वैशिष्टपूर्ण माहिती<br>१) लोंबी / कणसांची सरासरी लांबी<br>२) एका लोंबी / कणसातील<br>दाण्याची संख्या व वजन<br>३) एक ग्रॅममधील दाण्यांची संख्या | | |

**दाखला देण्यात येतो की, पीकाची कापणी पीकस्पर्धेच्या नियमानुसार आम्हा सर्वासमक्ष केली असून वरील उत्पादन बरोबर आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सही - | सही - | सही - | सही - | सही - |
| नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- |
| **पर्यवेक्षण अधिकारी सहभागी** | **लाभार्थी (शेतकरी)** | **सरपंच** | **उपसरपंच** | **ग्रामपंचायत सदस्य** |

---

| | | | |
|---|---|---|---|
| सही - | सही - | सही - | सही - |
| नाव :- | नाव :- | नाव :- | नाव :- |
| **प्रगतशील शेतकरी** | **पोलीस पाटील** | **तलाठी** | **ग्रामसेवक** |

---

| | |
|---|---|
| सही - | सही - |
| नाव - | नाव - |
| **कृषि पर्यवेक्षक** | **कृषि सहाय्यक / सेवक** |

## प्रपत्र-क

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

पिकस्पर्धेतील सहभागी स्पर्धक संख्या तपशील (पिककापणीपुर्वी)

| अ.क्र. | पिकाचे नाव | विभाग | जिल्हा | तालुका | सहभागी स्पर्धक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

**स्वाक्षरी/-**
तालुका कृषि अधिकारी/
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/
विभागीय कृषि सहसंचालक

## प्रपत्र- ड

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

तालुकास्तरावर पिकनिहाय पिककापणीनुसार आलेल्या उत्पादनाच्या गुणानुक्रमाचा तपशील

- सहभागी स्पर्धक संख्या -
- माघार घेतलेले स्पर्धक संख्या -
- प्रत्यक्ष पिक कापणी झालेले स्पर्धक संख्या -

| अ.क्र. | पिकाचे नाव | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | विभाग | आलेले उत्पादन (कि.ग्रॅ.प्रति हेक्टर) | गुणानुक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**स्वाक्षरी/-**
तालुका कृषि अधिकारी

## प्रपत्र – इ

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट/आदिवासी गट

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या नऊ** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानुक्रमांक | पिकाचे नाव | गाव | तालुका | आलेले प्रति हेक्टर उत्पादन |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |

**स्वाक्षरी/-**

तालुका कृषि अधिकारी----------

## प्रपत्र – इ – १

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या सहा** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानुक्रमांक | पिकाचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | आलेले प्रति हेक्टर उत्पादन |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

**स्वाक्षरी/-**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,----------

## प्रपत्र – इ – २

## (तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट

पिकस्पर्धेतील पीकनिहाय प्राप्त उत्पादकतेच्या आकडेवारीनुसार **पहिल्या तीन** शेतकऱ्यांचे गुणपत्रक

| गुणानुक्रमांक | पिकाचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | विभाग | आलेले प्रति हेक्टर उत्पादन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

**स्वाक्षरी/-**

विभागीय कृषि सहसंचालक,----------

<u>राज्यांतर्गत पीकस्पर्धेतून माघार घ्यावयाचा अर्जाचा नमुना</u>

**(तृणधान्य, कडधान्य, गळीतधान्य पिकस्पर्धा) सर्वसाधारण गट / आदिवासी गट**

दिनांक -

**प्रति,**

**तालुका कृषि अधिकारी, ,जिल्हा-**

मी, श्री. -----------------------------------------------मोबाईल नंबर----------------------

राहणार----------------------- पोस्ट-------------तालुका------------जिल्हा--------------

----------------- या पिकासाठी पिकस्पर्धेसाठी भाग घेलता होता. परंतु -----------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

या कारणास्तव, मी -----------पिकाच्या पिकस्पर्धेमधून स्वेच्छेने माघार घेत आहे.

**स्पर्धकाची सही**

नाव -

संपर्क क्र. -